● मंगळवार, दि ८ ऑक्टोबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ७७ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282




माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या प्रयत्नाला यश

# परशुराम आर्थिक विकास महामंडळाला महायुती सरकारकडुन ५० कोटीची तरतूद

**जालना । प्रतिनिधी -** परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करा या म ागणीसाठी बहुभाषिक ब्राह्मण महासंघाचे प्रदेशाध्यक्ष सुरेश मुळे यांनी सतरा वर्षांपूर्वी म ाजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांच्याकडे परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करा अशी मागणी केली होती. महायुती सरकारने परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन केले असून ब्राह्मण सम ाजाच्या वतीने माजी राज्यमंत्री अर्जुन खोतकर यांचा सत्कार करण्यात आला होता. ह्या सत्कारदरम्यान माजी मंत्री अर्जुन खोतकर यांनी बोलतांना सांगितले होते की, परशुराम आर्थिक विकास महामंडळास जास्तीत जास्त आर्थिक तरतूद कशी होईल यासाठी मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्याकडे पाठपुरावा करणार असल्याची प्रतिपादन खोतकर यांनी केले होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठपुरावा करून परशुराम विकास महामंडळाला परशुराम

पान २ वर



# शासकीय वैद्यकिय महाविद्यालयाचे उद्या दूरदृश्यप्रणालीद्वारे उदघाटन

**जालना -** राज्य शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या शासन निर्णयान्वये राज्यातील ८ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना मान्यता देण्यात आली आहे. त्या अनुषंगाने जालना जिल्ह्यासाठी मंजूर झालेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे उद्घाटन दूरदृश्यप्रणालीद्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. या दूरदृश्यप्रणाली उद्घाटन कार्यक्रमाचे आयोजन बूधवार, दि. ९ ऑक्टोबर, २०२४ रोजी दूपारी १२ वाजता जालना येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल सभागृहात आयोजित करण्यात आले असल्याचे शासकीय वैद्यकीय म हाविद्यालय जालना येथील अधिष्ठाता डॉ. सुधीर चौधरी यांनी कळविले आहे.



हा उद्घाटन कार्यक्रम राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असुन, केंद्रीय आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री जगतप्रकाश नड्डा हे प्रमुख पाहुणे असणार आहेत. याबरोबर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) प्रतापराव जाधव, आरोग्य व कुटूंब कल्याण केंद्रीय राज्यमंत्री श्रीम ती अनुप्रिया पटेल, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, वैद्यकीय शिक्षण व विशेष सहाय्य मंत्री हसन म ुश्रीफ, जालना जिल्हा पालकमंत्री अतुल सावे, खासदार कल्याण काळे, आमदार सर्वश्री राजेश राठोड, विक्रम काळे, सतिष चव्हाण, बबनराव लोणीकर, नारायण कुचे, संतोष दानवे, कैलास गोरंट्याल, राजेश टोपे, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे सचिव दिनेश वाघमारे, वैद्यकीय शिक्षण व आयुष आयुक्त राजीव निवतकर,

पान २ वर

युवा आदर्श

## हिंगलाज ...

**नाशिक खेडस्थानी**
**देवीमाता हिंगलाज**
**ज्योतिर्लिंग स्वरूप**
**आगळा तिचा बाज**
**हेमाडपंथी मंदिरात**
**घुमे श्री सूक्त आवाज**
**दर्शनार्थ महा सागर**
**लोटतो सर्व समाज**
**पाहताना रुप देखणे**
**गळतो अहंकारमाज**
**चतुर्भुजा सिंहासनी**
**ल्याली सुरेख साज**
**सूर्यचंद्र त्रिशूळ करी**
**मुकूट शिरी ऐटबाज**
**तृतीय नेत्र कपाळी**
**असूरा उग्रता अंदाज**
**कुमारीका खासमान**
**सांभाळे सर्व रिवाज**
**मुलींचे घालती वस्त्र**
**प्रथा अजूनही आज**
**मागा जोगवा आईचा**
**वाटा भाविका अनाज**
**पायी माथा टेकवता**
**फिटले ऋण सव्याज**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# सरकारने शिक्षकांचा अंत पाहू नये - शिक्षक महासंघ

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** गेल्या १६ आगस्ट २०२४ पासून प्रचलित नियमानुसार अनुदानासाठी मुंबईच्या आजाद मैदानावर आंदोलन करणाऱ्या शिक्षकांकडे सरकार जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. या संदर्भात कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाचे राज्य अध्यक्ष प्रा.डॉ. संजय शिंदे सचिव प्रा. संतोष फाजगे यांनी शिक्षण मंत्रीदिपक केसरकर तथा अर्थ मंत्री अजीत दादा पवार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की ताटी उघडा (दादा) ईश्वरा सरकार ने २०१४ पासून कायम शब्द काढला. परंतु प्रचलित नियमानुसार अनुदान न देता गेल्या १० वर्षा पासून ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणाऱ्या शिक्षकांची आर्थिक पिळवणूक केलेली आहे. तरी सरकारने शिक्षकांच्या आंदोलनाची दखल घेऊन तात्काळ प्रचलीत नियमानुसार अनुदान द्यावे. व ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणाऱ्या गुरूजींना ही लाडके गुरूजी करावेत. अशा आशयाचे निवेदन निवेदन जालना जिल्हा अध्यक्ष प्रा. सुग्रीव वासरे, सचिव प्रा. पी.बी. चौरे, उपाध्यक्ष प्रा. अरुण आहेर यांनी दिले आहे.

# शेतकऱ्यांना पीक नुकसानाची मिळणार भरपाई

**जालना । प्रतिनिधी -** प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप हंगाम २०२४-२५ म ध्ये अतिवृष्टी, ढगफुटी व पूर परिस्थितीम ुळे सोयाबीन, कापूस, तूर, मुग व उडिद या पिकांचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले होते. त्या अनुषंगाने जिल्हयामधील शेतकऱ्यांनी पिक नुकसानी बाबत एकूण ४८७८३४ पूर्वसूचना विमा कंपनीस प्राप्त झालेले आहे. त्यानुषंगाने युनिव्हर्सल सोंपो जनरल इंन्शुरन्स कंपनीस पिक विमा रक्कम तात्काळ शेतकऱ्याच्या बँक खात्यात जमा करणे बाबत सूचना देण्यात आलेल्या असून त्यानुसार कार्यवाही सुरु असल्याची माहिती जिल्हाधिकारी जालना श्री. डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली आहे.

जालना जिल्ह्याचे माहे जून ते सप्टेंबर दरम्यानचे सरासरी पर्जन्यमान ६०३.१ मौगी इतका असून सन २०२४-२५ मध्ये ८१२.४ मीमी इतका पाऊस पडलेला आहे व त्याधी टक्केवारी सरासरीच्या तुलनेत १३४.९% इतकी आहे. जालना जिल्ह्याचे माहे सप्टेंबर चे सरासरी पर्जन्यम ान १४१.८ भीभी इतका असून सन २०२४-२५ मध्ये २२१६.९ भीभी इतका पाऊस पडलेला आहे व त्याची टक्केवारी सरासरीच्या तुलनेत १६० १% इतकी आहे. माहे सप्टेंबर २०२४ मध्ये अतिवृष्टी, ढगफुटी व पूर परिस्थितीमुळे खरीप हंगाम ातील सोयाबीन, कापूस, तूर, मुग, उडिद, फळपिकांचे असे एकूण २५५५१९.९५ है. क्षेत्राचे नुकसान झालेले आहे. त्यानुसार २८२५३८ शेतकऱ्यांना ४१२.३० कोटी रक्कमेची नुकसान अनुदानाबाबतची म ागणी शासनास केलेली आहे. असे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# केंद्रीय नेतृत्त्वावर विश्वास, जे झाले ते चुकीचे - अब्दुल हाफिज

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्यावतीने जिल्ह्यातील पाचही विधानसभा मतदार संघातून काँग्रेस पक्षाकडुन निवडणुका लढविण्यासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या मुलाखती सोम वार (दि ७) आयोजित करण्यात आल्या होत्या. या मुलाखती दरम्यान आ. कैलास गोरंट्याल व अब्दुल हाफिज यांचे कार्यकर्ते समोरासमोर आल्याने काही काळ वाद निर्माण झाला होता. यावर अब्दुल हाफिज यांनी माध्यमांशी बोलतांना प्रतिक्रिया दिली असून ते म्हणाले की, पक्षात शिस्त हवी, उमेदवारी मागायची नाही का? जे घडले ते चुकीचे असून याबाबत वरिष्ठ पातळीवर आ. कैलास गोरंट्याल यांची तक्रार करणार आहे. ते विद्यमान आमदार आहेत त्यांना असे वागणे शोभत नसल्याचेही अब्दुल हाफिज म्हणाले. तसेच उमेदवारीबाबत आपण आश्वस्त असून केंद्रीय नेतृत्त्वावर माझा विश्वास आहे. जालना विधानसभेसाठी मलाच उमेदवारी जाहिर होण्याचीही शक्यता त्यांनी व्यक्त केली. मुस्लीम समाजाला न्याय मिळावा अशी भावना समाजात निर्माण झाली असून समाजातील मत जाणून घेतल्यानंतर व सम ाजातील मान्यवरांनी सांगितल्यामुळे उमेदवारीची मागणी केली असल्याचेही अब्दुल हाफिज यांनी म्हटले आहे.

# मंठा; शिवसेना शिंदे गटाचा बालेकिल्ला बनवणार - उदयसिंह बोराडे

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वावर विश्वास ठेवत उदयसिंह बोराडे यांच्या उपस्थितीत शेकडो महिलांचा प्रवेश

**मंठा । प्रतिनिधी -** नारीशक्तीचा ओघ मंठा तालुक्यातील शिवसेना शिंदे गटात सुरू असून तालुक्यातील शहरातील अनेक माता-भगिनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विश्वास ठेवत आता शिंदे गटाकडे वळत आहेत. महिलांच्या आयुष्यात सुखा समाधानाचे दिवस शिंदे सरकारने आणले शिंदे सरकारच्या म ाध्यमातून प्रत्येक जिल्हा तालुका शहर आणि गाव शिंदे सरकारवर विश्वास ठेवत आहे

मंठा तालुक्यातील युवा नेतृत्व उदयसिंह प्रल्हादराव बोराडे यांचा झंझावात तालुक्यातील ११७ गावे आणि ९२ ग्राम पंचायतीत पोहोचला आहे. युवकांच्या पक्षप्रवेश, वयस्कांचा आशीर्वाद पाठोपाठ आता माता भगिनी यांचा कल शिंदे सरकारकडे आहे. माझा भाऊ मुख्यमंत्री म्हणत अनेक महिलांनी उदयसिंह बोराडे यांच्या उपस्थित पक्षात प्रवेश केला.

शहर तालुक्यातील तळागाळातील म हिलांच्या कल्याणासाठी शिवसेना शिंदे गट वचनबद्ध आहे. मंठा शहरासह तालुका शिवसेना शिंदे गटाचा बालेकिल्ला बनवणार असल्याचा निर्धार मंठा तालुकाप्रमुख उदय दादा बोराडे यांनी केला आहे. त्यांच्या उपस्थितीत व शिवसेना महिला आघाडी उपजिल्हा प्रमुख कासाबाई शिरगुळे, तालुकाप्रम ुख सुनीता देशमुख, सविता गवळी, इंदुबाई लहाने, संगीता खराबे यांच्या मार्गदर्शनाखाली असंख्य महिलांचा शिवसेनेत प्रवेश यावेळी युवा सेना उपजिल्हा प्रमुख योगेशराव गणगे, युवा सेना तालुकाप्रमुख दीपक गायकवाड,भीम राव वाघ, माजी सरपंच प्रल्हाद सांगळे,व सर्व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.



## संपादकीय

# ...तर पुण्याचा बिहार होईल

बोपदेव घाटात गुरुवारी मित्रासोबत फिरायला गेलेल्या तरुणीवर तिघांनी बलात्कार केल्याची धक्कादायक घटना पुण्यात घडली. ही घटना ताजी असतानाच पुण्यातच दोन शाळकरी मुलींवर स्कूल व्हॅन चालकाने अत्याचार केल्याची घटना समोर आली या दोन घटनांनी पुणे शहर हादरले. अर्थात सांस्कृतिक शहर असलेल्या पुण्याला महिला अत्याचाराच्या घटना नवीन नाहीत. गेल्या वर्षभरात पुण्यात महिला अत्याचाराच्या घटनात सातत्याने वाढ होत आहे या घटनांनी सांस्कृतिक शहर असलेल्या पुण्याची मान शरमेने खाली झुकत आहे. मागील वर्षी राजगडाच्या पायथ्याशी दर्शना पवार नावाच्या उच्च शिक्षित मुलीची हत्या झाली होती. त्याचवेळी सदाशिव पेठेत भर दिवसा युवतीचा पाठलाग करून तिच्यावर कोयत्याने वार करण्याची घटना घडली होती प्रसंगावधान राखून एका युवकाने कोयता हिसकावून घेतल्याने त्या युवतीचे प्राण वाचले. सातत्याने घडणाऱ्या या घटनांनी पुण्यातील मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या घटना पुण्यासारख्या देशाच्या सांस्कृतिक राजधानीत आणि विद्येच्या माहेरघरात घडल्याने पुण्यासारख्या सुसंस्कृत शहराची मान शरमेने खाली झुकली आहे. एकेकाळी पुणे हे मुलींसाठी सर्वात सुरक्षित शहर समजले जात होते मात्र मागील काही वर्षापासून पुण्याची ही ओळख पुसली जात आहे. पुण्यात मागील सहा महिन्यात महिला अत्याचाराच्या ३६० घटना घडल्या आहेत. ही आकडेवारी चिंताजनक आहे. पुणे हे विद्येचे माहेरघर समजले जाते. सर्व प्रकारचे उच्च शिक्षण देणाऱ्या सर्वोत्तम संस्था पुण्यात आहे. पुण्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे भारतातच नाही तर जगात प्रसिद्ध आहे. शिवाय एमपीएससी, यूपीएससी सारख्या स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या अनेक संस्था पुण्यात आहेत त्यामुळे पुण्यात उच्च शिक्षणासाठी संपुर्ण देशातून विद्यार्थी येतात त्यात मुलींची संख्या लाक्षणिक असते. या विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत किमान चार ते पाच वर्षे लागतात. या चार पाच वर्षात या विद्यार्थ्यांचा मुक्काम पुण्यातच असतो. काही विद्यार्थी वसतिगृहात राहतात तर काही विद्यार्थी ग्रुप करून खाजगी खोली घेऊन भाडेतत्त्वावर राहतात. शिक्षणासाठी देशातील विविध भागांतील विद्यार्थी एकत्र येतात त्यांच्यात मैत्री होते कधी कधी या मैत्रीचे रूपांतर प्रेमात होते. कुटुंबापासून दूर असल्याने त्यांना कोणी हटकायलाही नसते. काही दिवस प्रेमात निघून गेल्यावर त्यांच्यात वाद निर्माण होतो मग दोघांचे ब्रेकअप होते मग त्यातूनच तू मेरी नही हो सकती तो किसीं की नहीं हो सकती या बॉलीवूडपटातील नायकाप्रमाणे मुले मुलींना त्रास देतात त्यातून मुलींवर अत्याचार आणि हत्या अशा घटना घडतात. काही वेळा एकतर्फी प्रेमातून तर काही वेळा गुंड प्रवृत्तीच्या लोकांकडून अशा घटना घडतात. आता तर शाळकरी मुलींवर देखील अत्याचार होऊ लागले आहे. जर अशा घटना घडतच राहिल्या तर पालक पुण्यात आपल्या पाल्याला शिकायला पाठवणार नाही. पुण्यातच नाही तर कोणत्याच शहरात पाठवणार नाहीत कारण पुण्यासारख्या शहरात जर मुली सुरक्षित राहू शकत नाही तर ती कुठेच सुरक्षित राहू शकत नाही अशीच पालकांची धारणा आहे. सभ्य लोकांचे सुसंस्कृत शहर ही पुण्याची ओळख इतिहासजमा होते की काय अशी शंका येऊ लागली आहे कारण पुण्यात अलीकडे गुन्हेगारी मोठया प्रमाणात वाढली आहे. पुण्यात कोयता गँगने दहशत माजवली आहे. भर दिवसा मुलींची हत्या होत आहे याचाच अर्थ हल्लेखोरांना कायद्याचा धाक उरला नाही आपण काहीही केले तरी कायदा आपले काहीही करू शकत नाही अशीच धारणा गुन्हेगारांची झाली आहे. गुन्हेगारांना पोलिसांचा भीती वाटत नाही. भर दिवसा जर अशा घटना घडत असतील ती पुणे पोलिसांसाठी नामुष्कीची बाब आहे. पुण्यात गुन्हेगारी अशीच वाढत राहिली तर भविष्यात पुण्याचा बिहार होऊ शकतो तो होऊ द्यायचा नसेल तर पोलिसांनी पुण्यातील गुन्हेगारी रोखण्यासाठी कठोर पावले उचलायला हवीत. महिला अत्याचार किंवा भर दिवसा मुलींवर हल्ला करणाऱ्या हल्लेखोरांना कठोरात कठोर शिक्षा व्हायला हवी. गुन्हेगारांना कायद्याचा धाक राहिला तरच सभ्य लोकांचे सुसंस्कृत पुणे ही पुण्याची ओळख कायम राहील अन्यथा पुण्याचा बिहार होईल.



**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# नवरात्र व्रताचा इतिहास, महत्त्व आणि शास्त्र

**सर्वमंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके ।**
**शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणि नमोस्तुते ।।**

अर्थ : सर्व मंगलकारकांची मंगलरूप असणारी; स्वतः कल्याणशिवरूप असणारी; धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चारही पुरुषार्थ साध्य करून देणारी; शरण जाण्यास योग्य असणारी; त्रिनेत्रयुक्त असणारी, अशा हे नारायणी देवी, तुला मी नमस्कार करतो.

श्री दुर्गादेवीच्या अतुलनीय गुणवैशिष्ट्यांची ओळख या एका श्लोकावरून होते. जीवनाला परिपूर्ण करणारे जे-जे आहे, त्या त्या सर्वांचे मूर्तीमंत प्रतीक म्हणजे आदिशक्ती श्री दुर्गादेवी. श्री दुर्गादेवीला सर्व जगताची जननी म्हटले आहे. जगताची जननी आपणा सर्वांचीच ती आई असल्याने लेकरांच्या हाकेला सत्वर धावून येते.

महिषासुराच्या नाशासाठी अवतार घेणार्या श्री दुर्गादेवीचा उत्सव म्हणजे नवरात्र ! नवरात्रात घटस्थापना करतात. घटरूपी ब्रह्मांडात अवतीर्ण झालेल्या तेजस्वी अशा आदिशक्तीचे म्हणजेच श्री दुर्गादेवीचे अखंड तेवणार्या नंदादीपाच्या माध्यमातून नऊ दिवस पूजन करणे, म्हणजे नवरात्रोत्सव साजरा करणे. या वर्षी ३ ऑक्टोबर ते ११ ऑक्टोबर या कालावधीत नवरात्रोत्सव साजरा होत आहे. नवरात्र हे देवीचे व्रत असून महाराष्ट्रासह अनेक ठिकाणी हे व्रत कुलाचार म्हणूनसुद्धा पाळले जाते. या व्रतात नऊ दिवस व्रतस्थ राहून देवीची मनोभावे आराधना केली जाते. आज अनेक राज्यांत याला उत्सवाचे स्वरूपही आले आहे. या उत्सवात हिंदूंना देवीतत्त्वाचा लाभ होतो; मात्र हल्ली नवरात्रोत्सवाला आलेल्या विकृत स्वरूपामुळे त्यातून देवीतत्त्वाचा लाभ तर दूरच; पण त्याचे पावित्र्यही घटले आहे. या उत्सवातील अनुचित प्रकार रोखून त्याचे पावित्र्य राखणे, हेही काळानुसार धर्मपालनच ! नवरात्र व्रतामागील इतिहास, या व्रताचे महत्त्व आणि ते साजरे करण्यामागील शास्त्र या लेखातून जाणून घेऊया.

तिथी : आश्विन शुद्ध प्रतिपदा ते नवमी.

इतिहास : रामाच्या हातून रावणाचा वध व्हावा, या उद्देशाने नारदाने रामाला नवरात्रीचे व्रत करायला सांगितले. नंतर हे व्रत पूर्ण केल्यावर रामाने लंकेवर स्वारी करून शेवटी रावणाला ठार मारले.

महिषासुर नावाच्या असुराशी प्रतिपदा ते नवमी असे नऊ दिवस युद्ध करून देवीने नवमीला रात्री महिषासुराला ठार मारले. तेव्हापासून तिला महिषासुरमर्दिनी म्हणू लागले.

महत्त्व : जगात जेव्हा जेव्हा तामसी, आसुरी आणि क्रूर लोक प्रबळ होऊन सात्त्विक अन् धर्मनिष्ठ सज्जनांना छळतात, तेव्हा देवी धर्मसंस्थापनेकरता पुनःपुन्हा अवतार घेते. त्या देवतेचे हे व्रत आहे.

नवरात्रीत देवीतत्त्व नेहमीपेक्षा १००० पटीने कार्यरत असते. देवीतत्त्वाचा अधिकाधिक लाभ मिळण्यासाठी नवरात्रीच्या काळात 'श्री दुर्गादेव्यै नमः ।' हा नामजप अधिकाधिक करावा.

व्रत करण्याची पद्धत : नवरात्र व्रताला पुष्कळ घराण्यांत कुलाचाराचे स्वरूप असते. आश्विन शुद्ध प्रतिपदेस या व्रताचा प्रारंभ होतो.

घरात पवित्र स्थानी एक वेदी सिद्ध करून त्यावर सिंहारूढ अष्टभुजादेवीची आणि नवार्णयंत्राची स्थापना करावी. यंत्राशेजारी घट स्थापून त्याची आणि देवीची यथाविधी पूजा करावी.




नवरात्रमहोत्सवात कुलाचाराप्रमाणे घटस्थापना आणि मालाबंधन करावे. शेतातील मृत्तिका आणून तिचा दोन पेरे (बोटाची) जाड चौकोनी थर करावा आणि त्यात (पाच किंवा) सप्तधान्ये घालावी. जव, गहू, तीळ, मूग, राळे, सावे आणि चणे ही सप्तधान्ये होत.

मृत्तिकेचा किंवा तांब्याचा कलश घेऊन त्यात पाणी, गंध, फुले, दूर्वा, अक्षता, सुपारी, पंचपल्लव, पंचरत्ने किंवा नाणे इत्यादी वस्तू घालाव्यात.

सप्तधान्ये आणि कलश (वरुण) स्थापनेचे वैदिक मंत्र येत नसल्यास पुराणोक्त मंत्र म्हणावेत. तेही येत नसल्यास त्या त्या वस्तूचे नाम घेऊन 'समर्पयामि' म्हणून नाममंत्रांचा विनियोग करावा. कलशामध्ये माळ पोहोचेल अशी बांधावी.

नऊ दिवस प्रतिदिन कुमारिकेची पूजा करून तिला भोजन घालावे. सुवासिनी म्हणजे प्रकट शक्ती, तर कुमारिका म्हणजे अप्रकट शक्ती. प्रकट शक्तीचा थोडा अपव्यय होत असल्याने सुवासिनीपेक्षा कुमारिकेत एकूण शक्ती जास्त असते.

अखंड दीपप्रज्वलन, त्या देवतेचे माहात्म्यपठन (चंडीपाठ), सप्तशतीपाठ, देवीभागवत, ब्रह्मांडपुराणातील ललितोपाख्यानाचे श्रवण, ललिता-पूजन, सरस्वतीपूजन, उपवास, जागरण इत्यादी कार्यक्रम करून क्षमता आणि सामर्थ्य यांनुसार नवरात्रमहोत्सव साजरा करावा.

पूजकाला उपवास असला, तरी देवतेला नेहमीप्रमाणे अन्नाचा नैवेद्य दाखववावा.

या काळात उत्कृष्ट आचाराचे एक अंग म्हणून श्मश्रू न करणे (दाढीमिशीचे केस आणि डोक्यावरील केस न कापणे), कडक ब्रह्मचर्यपालन, पलंगावर अन् गादीवर न झोपणे, सीमा न उल्लंघणे, पादत्राणे न वापरणे अशा विविध गोष्टींचे पालन केले जाते.

नवरात्राच्या संख्येवर भर देऊन काही जण शेवटच्या दिवशीही नवरात्र ठेवतात; पण शास्त्राप्रमाणे शेवटच्या दिवशी नवरात्र उठणे आवश्यक आहे. त्या दिवशी समाराधना (भोजनप्रसाद) झाल्यावर वेळ उरल्यास त्याच दिवशी सर्व देव काढून अभिषेक आणि षोडशोपचार पूजा करावी. हे शक्य नसल्यास दुसर्या दिवशी सर्व देवांवर पूजाभिषेक करावा.

देवीच्या मूर्तीच्या विसर्जनाच्या वेळी पेरलेल्या धान्याची झालेली रोपे देवीला वाहतात. त्या रोपांना 'शाकंभरीदेवी' म्हणून स्त्रिया डोक्यावर धारण करून विसर्जनाला घेऊन जातात.

नवरात्र बसवतांना आणि उठवतांना देवांचे 'उद्वार्जन' अवश्य करावे. उद्वार्जनासाठी नेहमीप्रमाणे लिंबू, भस्म इत्यादी वस्तू वापराव्यात. रांगोळी किंवा भांडी घासायचे चूर्ण वापरू नये.

शेवटी स्थापित घट आणि देवी यांचे मनोभावे उत्थापन (विसर्जन) करावे.

नवरात्र किंवा इतर धार्मिक विधींत दिवा अखंड तेवत राहणे, हा पूजाविधीचा महत्त्वाचा भाग असतांना तो वारा, तेल न्यून (कमी) पडणे, काजळी धरणे इत्यादी कारणांमुळे विझल्यास ती कारणे दूर करून दिवा परत प्रज्वलित करावा आणि प्रायश्चित्त म्हणून अधिष्ठात्या देवतेचा एकशे आठ किंवा एक सहस्र आठ वेळा नामजप करावा.

देवीची पुढीलप्रमाणे प्रार्थना करतात : हे देवी, आम्ही शक्तीहीन झालो आहोत, अमर्याद भोग भोगून मायासक्त झालो आहोत. हे माते, तू आम्हाला बळ देणारी हो. तुझ्या शक्तीने आम्ही आसुरी वृत्तींचा नाश करू शकू.

घागरी फुंकणे : अष्टमीला स्त्रिया श्री महालक्ष्मीदेवीची पूजा करतात आणि घागरी फुंकतात.

प्रांतभेद : गुजरातमध्ये मातृशक्तीचे प्रतीक म्हणून नवरात्रात अनेक छिद्रांच्या मातीच्या मडक्यात ठेवलेला दीप किंवा दिवा पूजला जातो. स्त्रीच्या सृजनात्मकतेचे प्रतीक म्हणून नऊ दिवस पूजल्या जाणार्या 'दीपगर्भ'मधल्या 'दीप' शब्दाचा लोप होऊन गर्भ-गरभो-गरबो किंवा गरबा असा शब्द प्रचलित झाला.

भावार्थ : असुर या शब्दाची व्युत्पत्ती आहे - 'असुषु रमन्ते इति असुरः ।' म्हणजे प्राणातच, भोगातच रममाण होतात ते असुर होत. अशा महिषासुराचा आज प्रत्येक मनुष्याच्या हृदयात अल्प वा अधिक प्रमाणात वास असून त्याने मनुष्याच्या आंतरिक दैवीवृत्तींवर वर्चस्व प्रस्थापित केले आहे. या महिषासुराची माया ओळखून त्याच्या आसुरी विळख्यातून मुक्त होण्यासाठी शक्तीच्या उपासनेची आवश्यकता आहे. यासाठी नवरात्रीतील नऊ दिवस शक्तीची उपासना करावी. दशमीला विजयोत्सव साजरा करावा. त्याला दसरा म्हणतात.

नवरात्रोत्सवातील अपप्रकार रोखून उत्सवाचे पावित्र्य राखा !

पूर्वी 'गरबा' या नृत्याच्या वेळी देवीची, कृष्णलीलेची आणि संतांनी रचलेली गीतेच म्हटली जात असत. आज भगवंताच्या या सामूहिक नृत्योपासनेला विकृत स्वरूप आले आहे. चित्रपटांतील गीतांच्या तालावर अश्लील अंगविक्षेप करून गरबा खेळला जातो. गरब्याच्या निमित्ताने महिलांच्या छेडछाडीच्या घटना घडतात. पूजास्थळी तंबाखूसेवन, मद्यपान, ध्वनीप्रदूषण इत्यादी अपप्रकारही घडतात. हे अपप्रकार म्हणजे धर्म आणि संस्कृती यांची हानी होय. हे अपप्रकार रोखणे, हे काळानुसार आवश्यक धर्मपालनच आहे.

**संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'सण,धार्मिक उत्सव आणि व्रते'**
**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था**
**संपर्क- ९२८४०२७१८०**

# आपत्तीत शेतकरीच का कोसकतात!

नैसर्गिक आपत्ती आली की, शेतकरीच का कोलमडतात. इतरांना त्याचा फटका का बसत नाही? अतिवृष्टी होवो की दुष्काळ पडो आमच्या देशातील शेतकरी देशोधडीला लागतात. आणि सरकारी नोकर, पुढारी, डॉक्टर, वकील, बिल्डर सारखे व्यावसायिक यांना त्याची जरा सुद्धा इजा होत नाही. असे का आहे?

याचे खरे (मुळातले) कारण असे आहे की, शेतकरी अनेक कायद्यांनी जेरबंद करण्यात आला आहे, त्यामुळे तो आधीच जर्जर झाला आहे. थोडाही अपाय तो सहन करू शकत नाही. आकाश फाटले तर तो कसे सहन करेल? वर वर आस्मानी संकट दिसत असले तरी मुळाशी सुलतानी संकतच असते.

नोकरदार, पुढारी, व्यापारी, व्यावसायिक यांच्या पायात तशा बेड्या नाहीत म्हणून ते नैसर्गिक आपत्तीत



देखील तगून जातात. त्यांना आपत्ती आली काय आणि गेली काय, कळत सुद्धा नाही.

शेतकऱ्यांच्या नावेत छिद्र करून ठेवले आहे, इतरांचे जहाज भरभक्कम आहे. पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा, दुष्काळाने निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा कायम बंदोबस्त करायचा असेल तर १) कमाल शेतजमीन धारणा (सीलिंग) २) आवश्यक वस्तू ३) जमीन अधिग्रहण असे शेतकऱ्यांना गुलाम करणारे कायदे रद्द करून घ्यावे लागतील. अन्यथा दर वर्षी आपल्याला नुकसान भरपाई किंवा मदत मागत रहावे लागेल. मला वाटते, किसानपुत्रांनी शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहून एकदा सोक्ष-मोक्ष करून टाकावा! शेतकऱ्यांच्या नावेला जे असंवैधानिक कायद्यांचे भोक पडले आहे, ते एकदा बुजवून घ्यावे!

**अमर हबीब**
**किसानपुत्र आंदोलन**
**८४११९०९९०९**

# बीडकडील अवजड वाहनांच्या मार्गात बदल

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ ची कलम ३६ अन्वये जालनाकडुन अंबडमार्गे बीडकडे जाणाऱ्या व येणाऱ्या अवजड वाहनांना दि. ७ ऑक्टोबर २०२४ रोजी ४ वाजेपासून ते दि. ९ ऑक्टोबर रोजी रात्री १२ वाजेपर्यंत कालावधीत वाहतुकीच्या मार्गात बदल करण्यात आला आहे. तसेच वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे, असे आदेश पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांनी जारी केले आहेत. बीडकडून अंबडमार्गे जालनाकडे येणारी अवजड वाहने ही शहागड, हरीओम हॉटेल वडीगोद्री समोरील उड्डाणपुलाचे खालुन, पाचोड, अंबड, गोलापांगरीमार्गे जालनाकडे जातील. तसेच जालनाकडुन अंबडमार्गे बीडकडे जाणारी अवजड वाहने ही याच पर्यायी मार्गाचा अवलंब करतील. घनसावंगीकडुन अंबडमार्गे जालनाकडे जाणारी अवजड वाहने ही सुतगिरणी चौफुली घनसावंगी, गुरुपिंपरी, राणी उंचेगाव, राणी उंचेगाव फाटा, अंबड येथील महालक्ष्मी पेट्रोल पंपा समोरुन, गोलापांगरी मार्गे जालनाकडे जातील. जालनाकडून अंबडमार्गे घनसावंगीकडे जाणारी अवजड वाहनेही याच पर्यायी मार्गाचा अवलंब करतील. घनसावंगीकडून अंबडमार्गे शहागडकडे जाणारी अवजड वाहने ही सुतगिरणी चौफुली घनसावंगी, तिर्थपुरी, सुखापुरी, सुखापुरी फाटा, वडीगोद्रीमार्गे शहागडकडे जातील. शहागडकडून अंबडमार्गे घनसावंगीकडे जाणारी वाहने याच पर्यायी मार्गाचा अवलंब करतील. असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

# जिल्ह्यात विविध तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी** - महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी) आयोजित व जिल्हा उद्योग केंद्र, जालना पुरस्कृत विशेष घटक प्रवर्गातील युवक-युवतींकरिता सन २०२४-२५ अंतर्गत मोफत विविध तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी जिल्ह्यातील इच्छुकांनी प्रशिक्षणाचा लाभ घेवून स्वतःचा स्वंयरोजगार उभारावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक योगेश सारणीकर आणि विभागीय अधिकारी सुदाम थोटे यांनी केले आहे.

जिल्ह्यात आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षणात जालना येथे ब्युटी पार्लर, बदनापूर येथे बेसिक अकाऊटींग, जाफ्राबाद येथे गारमेंट तयार करणे आणि अंबड येथे बेसिक कॉम्प्युटर प्रशिक्षण तर परतूर येथे फॅशन डिझायनिंगचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. उद्योग व्यवसाय क्षेत्राकडे लाभार्थींनी वळून स्वतःचा स्वंयरोजगार निर्माण करावा हा या कार्यक्रम आयोजनाचा मुख्य उद्देश आहे. प्रात्याक्षिकद्वारे सविस्तर प्रशिक्षण दिले जाणार आहे.

उद्योजकता विकास प्रशिक्षणात उद्योजकीय गुणसंपदा, उद्योजकीय व्यक्तीमत्व विकासासाठी सिध्दी प्रेरणा प्रशिक्षण, बाजारपेठ, पाहणीतंत्र व तंत्र विपणन व्यवस्थापन, प्रकल्प अहवाल, कर्ज योजना व कर्ज प्रकरणे व्यवस्थापन व विक्री कौशल्य लघु उद्योग विषयक कायदे, शासकीय धोरणे, अकाउंटस, लघु उद्योजकाचे व्यवस्थापन, बँकेचे व्यवहार इत्यादीबाबत मार्गदर्शन करण्यात येईल. प्रशिक्षण कार्यक्रम हा संपूर्णतः मोफत असून यासाठी लाभार्थी किमान सातवी पास आणि वय वर्षे १८-४५ दरम्यान असलेल्या पात्रता धारक इच्छुक लाभार्थींना प्रवेश देण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी फोन. नं.०२४८२-२२०५९२ येथे संपर्क साधावा. असे प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र ,जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# शेतकऱ्यांना खरेदी केंद्रावरील नोंदणीसाठी आवाहन

**जालना -** जालना जिल्ह्यात केंद्र शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत नाफेडच्या वतीने खरीप हंगामातील मुग ८ हजार ६८२, उडीद ७ हजार ४०० व सोयाबीन ४ हजार ८९२ दर प्रती क्विंटलप्रमाणे खरेदी व ऑनलाईन नोंदणीसाठी पणन महासंघाने जिल्ह्यात ११ खरेदी केंद्र सुरु केले आहेत. तरी शेतकऱ्यांनी मुग, उडीद व सोयाबिन पिकासाठी पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करावी. नोंदणीसाठी सातबारा उतारा, नमुना ८-अ, चालु वर्षाचा सातबारावरील पीक पेरा नोंद, बँकेचे पासबुक ही कागदपत्रे आवश्यक आहेत. तसेच शेतकऱ्यांनी भ्रमणध्वनीवर एसएमएस प्राप्त झाल्यानंतर शेतमाल विक्रीसाठी खरेदी केंद्रावर घेवून यावा, असे आवाहन जिल्हा पणन अधिकारी विजय राठोड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## पान १ वरुन

### परशुराम आर्थिक ...

आर्थिक विकास महामंडळ जास्तीत जास्त तरतूद करून द्या अशी मागणी माजी मंत्री खोतकर यांनी मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्याकडे केली होती मुख्यमंत्री शिंदे यांनी परशुराम महामंडळाला ५० कोटीची तरतूद करून दिली आहे माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या प्रयत्नाला पुन्हा यश आले आहे. ब्राह्मण समाजाच्या वतीने माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांचे बहुभाषिक ब्राह्मण महासंघाचे प्रदेशाध्यक्ष सुरेश मुळे, ॲड. सुनील किनगावकर. भगवान पुराणीक, रवींद्र देशपांडे यांनी सत्कार करून आभार व्यक्त केले आहे.

### शासकीय वैद्यकिय ...

जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, वै.शि.व संशोधन संचालक डॉ. अजय चंदनवाले, वै.शि.व संशोधन उपसंचालक डॉ. विवेक पाखमोडे उपस्थित राहणार असल्याचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय जालना येथील अधिष्ठाता डॉ. सुधीर चौधरी यांनी कळविले आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या उद्धाटन कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय जालना येथील अधिष्ठाता डॉ. सुधीर चौधरी केले आहे.

# जालना विधानसभा मतदारसंघ शिवसेनेकडे घेऊन भास्कर अंबेकर यांना उमेदवारी द्या

## शिवसेना पदाधिकार्यांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याकडे जोरदार मागणी

**जालना | प्रतिनिधी -** जालना विधानसभा मतदार संघातील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे तालुकाप्रमुख हरिहर शिंदे यांच्या नेतृत्वात पदाधिकार्यांच्या शिष्टमंडळाने पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची मुंबई येथील त्यांच्या मातोश्री निवासस्थानी भेट घेतली. जालना विधानसभेत आजपर्यंत चार वेळा शिवसेना पक्षाचा आमदार निवडून आलेला आहे. जालना नगर परिषदेतही गेली अनेक वर्षे शिवसेनेचाच झेंडा होता. त्यामुळे या मतदार संघात पक्षाला मानणारा मोठा मतदार आहे. जालना मतदार संघ महाविकास आघाडीच्या जागा वाटपात लोकसभेला काँग्रेसला सुटल्याने जालना विधानसभेची जागा शिवसेनेला सोडवून घेऊन शिवसेना जिल्हाप्रमुख भास्कर अंबेकर यांना उमेदवारी द्यावी, अशी जोरदार मागणी शिष्टमंडळाच्या वतीने करण्यात आली.

भास्कर अंबेकर हे गेली ३८ वर्षे शिवसेनेचे निष्ठावंत शिवसैनिक म्हणून कार्यरत आहेत. पक्षाच्या फुटी नंतरही ते शिवसेनेतच राहिले. अनेकविध पक्षांनी त्यांना आपल्या पक्षाकडून उमेदवारी देऊ केली असतानाही पक्षनिष्ठा न सोडता त्यांनी शिवसेनेतच काम केले. शिवसेनेचे शहर प्रमुख, उपजिल्हाप्रमुख व गेल्या पंधरा वर्षांपासून जिल्हाप्रमुख म्हणून त्यांनी संघटना मजबूत केली.जालना नगरपरिषदेमध्ये अनेकवेळा नगरसेवक, दोन वेळा नगराध्यक्ष म्हणून काम केले. आपल्या नगराध्यक्ष पदाच्या कारकिर्दीत त्यांनी अनेक विकास कामे केल्याने शहरवासीयांना त्यांची कारकीर्द कायम संस्मरणीय आहे. त्यांचा दांडगा जनसंपर्क व सर्वांना सोबत घेऊन चालण्याच्या दृष्टीमुळे ते लोकप्रिय आहेत. जालना बाजार समितीतही ते सोळा वर्षे संचालक व उपसभापती म्हणूनही त्यांनी काम केले .खरंतर त्यांना खूप वर्षांपूर्वीच विधानसभेची संधी मिळायला पाहिजे होती. आता तरी जालना विधानसभा मतदार संघ शिवसेनेकडे घेऊन शिवसेना जिल्हाप्रमुख भास्कर अंबेकर यांना उमेदवारी द्यावी. अशी जोरदार मागणी उद्धव ठाकरे यांच्याकडे शिष्टमंडळांने केली. या शिष्टमंडळात तालुकाप्रमुख हरिहर शिंदे यांच्यासह माजी जिल्हा परिषद सदस्य बबनराव खरात, माजी पं. स. सभापती मुरली थेटे, माजी जि.प. सभापती देवनाथ जाधव, विधानसभा संघटक दीपक रणनवरे, शहरप्रमुख बाला परदेशी, घनश्याम खाकीवाले, दुर्गेश काठोटीवाले, उपतालुका प्रमुख प्रभाकर उगले, हरिभाऊ शेळके, प्रभाकर घडलिंग, अंकुशराव राजेजाधव, माजी जि.प.सदस्य अशोक खलसे, युवा सेनेचे संदीप मगर,परमेश्वर डोंगरे,

संतोष खरात, बळीराम ढवळे, सुरेश वाघमारे यांच्यासह आदींची उपस्थिती होती.



# श्री जोगेश्वरी माता नवरात्रोत्सव

**जाफराबाद | प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील विदर्भ सर हद्दवर असलेले कोनड बु, ता. जाफराबाद येथील पंचक्रोशीत प्रसिद्ध गावाचे पूर्वेस असलेले जोगेश्वरी माता गडावर अनेक वर्षाचे परंपरेनुसार नवरात्र उत्सव फार भावभक्तीने साजरा केल्या जातो,

सुमारे साडेचारशे वर्षांपूर्वीपासून या देवीची गवळी समाजाने स्थापना केलेली आहे अशी आख्यायिका असून छोटेसे हेमाडपंती मंदिर होते त्या जागेवर समस्त गावकऱ्यांचे विचाराने संस्थांमधून भव्य दिव्य मंदिराचा जीर्णोद्धार करून भव्य असे मंदिर बांधण्यात आले त्याचबरोबर वृक्षारोपण करून निसर्गरम्य स्थळ निर्माण झाले आहे चैत्र पौर्णिमा व नवरात्र फार मोठा उत्सव या ठिकाणी पूर्वजापासू चालत आलेला असून आज त्याला फार मोठे स्वरूप प्राप्त झाले आहे ,अनेक भाविक भक्त रोज नित्यनेमाने दर्शनाला हजेरी लावतात नवरात्र मध्ये परंपरेपासून आजही त्या ठिकाणी नवरात्र उपवास करणारे भक्त गडावर रात्रंदिवस मुक्काम करतात आणि शेवटच्या दिवशी मोठ्या भक्ती भावाने होम हवन होते उपवास करणारी अनेक मंडळी गडावरच देवीच्या



साक्षीने उपवास सोडतात या नऊ दिवसांमध्ये सांस्कृतिक देवीचा जागर गोंधळ भजन कीर्तन कार्यक्रमाची रेलचेल असते काही दिवस श्री लक्ष्मण नारायण परिहार यांनी या ठिकाणी देवी भागवत महिमा घडवून आणला, त्याचप्रमाणे विजय नाना परिहार यांचे वडील कै .श्रीराम गुरुजी यांचे मरणार्थ एक पंधरा वर्षांपूर्वी त्यांनी पाण्याचा हौद बांधून दिल्यामुळे जोगेश्वरी मातेच्या गडावर येणाऱ्या जाणाऱ्या भक्तांची पाणी पिण्याची व्यवस्था झाली धार्मिक स्थळाबरोबरच निसर्गरम्य परिसरामुळे पंचकर्षेतील अनेक सहली या ठिकाणी येत असून अनेक भाविक भक्त दर्शनाला येऊन मनोभावे जोगेश्वरी मातेसमोर नतमस्तक होतात अनेक लोकांची धारणा आजही देवीप्रती जागृत दैवत म्हणून मनातील मनोकामना पूर्ण होण्यासाठी नवस करतात आणि ते पूर्णत्वास गेल्याचे सांगतात त्यामुळे निसर्गाचे कुशीत वसलेले छोटेसे कोनडगाव पश्चिमेकडून वेशी समोर निजाम कालीन असलेले लिंबाचे व चिंचेचे असलेले महाकाय वृक्ष आजही आपल्या पाऊल खुणा सांगतात शेजारून वाहणारी काळणा नदी गाव शेजारी डोंगर त्याचप्रमाणे जोगेश्वरी माता गड या गावाचे खरे वैभव दाखविणारे आहे एकदा निश्चितपणाने या स्थळास भेट देऊन अनुभव घ्यावा,

# राज्यस्तरीय संविधान जन-जागरण रॅलीचे जालना नगरीत स्वागत




**जालना | प्रतिनिधी -** भारतीय संविधानाचे अमृत महोत्सवी वर्ष असल्याने भारतीय संविधानावर व आरक्षणावर देशभर उलट सुलट चर्चा होत आहेत अशा वेळी बहुजन समाजाला खऱ्या अर्थाने संविधान व आरक्षण मागील भूमिका तसेच शत्रुपक्ष व मित्रपक्ष समजून सांगण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश बसपाच्या वतीने ३० सप्टेंबर ते ९ ऑक्टोंबर पर्यंत दीक्षाभूमी ते चैत्यभूमी राज्यस्तरीय संविधान जागरण रॅलीचे आयोजन करण्यात आलेले आहे. या रॅलीचे प्रमुख मार्गदर्शक बसपाचे केंद्रीय प्रदेश प्रभारी तथा माजी खासदार, राज्यसभा डॉ. अशोक सिध्दार्थ, रॅलीचे नेतृत्व व मार्गदर्शक बसपाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष ॲड. सुनिल डोंगरे हे करणार आहे. तर या रॅलीत महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष प्रा. संतोष शिंदे, महाराष्ट्र प्रदेश महासचिव मुकुंदराव सोनवणे, महाराष्ट्र प्रदेश कोषाध्यक्ष अब्दुल रऊफ मो. युसुफ, मराठवाडा कॅडर प्रशिक्षक व जालना सेंकड इंचार्ज योगीराज आनंद हे उपस्थित राहणार आहे. अशा प्रकारची माहिती बहुजन समाज पार्टीचे जालना विधानसभा अध्यक्ष राहुल करनाडे यांनी दिली.

संविधान रॅली दिनांक ५ ऑक्टोंबर २०२४ शनिवार रोजी जालना येथे आगमन झाले. या रॅलीचे स्वागत बसपाचे जालना जिल्हाध्यक्ष चंद्रमणी गाडेकर, जालना जिल्हाप्रभारी फेरोज अली, जालना विधानसभा अध्यक्ष राहुल करनाडे, महिला जिल्हाध्यक्षा अर्चना खिल्लारे, किशोर बोरुडे, ॲड. जयकुमार भालमोडे, बाबुराव बोर्डे, विनोद बिरसोने, शहराध्यक्ष सिद्धार्थ मोरे, जालना विधानसभा प्रभारी संजय खरात, शेख फेरोज, विधानसभा उपाध्यक्ष कुलदीप चांदोडे, विधानसभा महासचिव रविंद्र गवई, विधासभा सचिव दिपक डोंगरे, विधानसभा सचिव राहुल खिल्लारे, विधानसभा कोषाध्यक्ष सैय्यद स्माईल, कुलदीप चांदोडे, रविंद्र गवई, दिपक डोंगरे, सय्यद ईस्माईल भाई, राम जोहरे, सिध्दार्थ मोरे, कैलास जाधव, अशोक चांदोडे, गिरधारी लोंढे, शेख शरीफ आदींची उपस्थिती होती.

## ग्राहक परिषदेत तक्रारींचे निराकरण करण्यात अपयश

# आठही तालुक्यात लोकशाही दिन घेण्याची सदस्य रमेश तारगे यांची मागणी


**जालना | प्रतिनिधी -** ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण आणि जिल्हा स्तरावरील वाद मिटवण्याची जबाबदारी असलेल्या जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर कारवाई होत नसल्याची टीका होत आहे. गेल्या सात महिन्यांत, अनेक सरकारी प्रतिनिधी वारंवार परिषदेच्या बैठकांना उपस्थित राहण्यास अपयशी ठरल्यामुळे तक्रारींचे निराकरण झाले नाही. सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या परिषदेच्या बैठकीत अशासकीय सदस्यांनी आपल्या चिंता व्यक्त केल्या. अतिरिक्त जिल्हाधिकारी रिता मेत्रेवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत परिषदेचे कामकाज सुरळीत नसल्याबद्दल नाराजी दिसून आली. अनेक स्मरणपत्रे आणि सूचना देऊनही, सरकारी प्रतिनिधी बैठकीला आले नाहीत. गैरहजर सदस्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येईल, असे आश्वासन मेत्रेवार यांनी परिषदेला दिले. सरकारी आणि गैर-सरकारी अशा २८ सदस्यांचा समावेश असलेली परिषद ग्राहक-संबंधित समस्यांचे निराकरण करण्यासाठी आणि उपाय शोधण्यासाठी स्थापन करण्यात आली होती. मात्र, सरकारी सदस्यांच्या निष्क्रियतेमुळे अनेक प्रश्न सुटलेले नाहीत. बैठकीत अशासकीय सदस्यांनी ग्रामीण भागातील अपुरी बीएसएनएल सेवा, जालना शहरातील रस्त्यांवर लावलेले विजेचे खांब, भटक्या कुत्र्यांचा वाढता उपद्रव, विशाल कॉर्नरवरील पथदिव्यांचा अभाव, यासह विविध गंभीर समस्या मांडल्या. सायकल स्टँडवर जादा भाडे आकारणे आणि अन्न भेसळ. शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांना नुकसान भरपाई देण्यात अपयश आले आणि तहसील स्तरावर परिषद बैठक घेतली. या बैठकीला संजय देशपांडे, नंदकुमार देशपांडे, शालिनी पुराणिक, संदीप काबरा, सतीश पंच, रमेश तारगे, अनिल मुंदडा, बाळासाहेब सोनटक्के, विजय जाधव आणि अहमद नूर कुरेशी यांच्यासह अनेक अशासकीय



सदस्यांची उपस्थिती होती. सरकारच्या बाजूने वजन व माप विभागाचे आर. डी. दराडे, डी.व्ही. यांच्यासह काही प्रतिनिधी उपस्थित होते. पाटील, अन्न व औषध प्रशासनाकडून डी.बी. कृषी विभागाचे जगधने, जिल्हा परिषद आरोग्य विभागाचे डी.एस.बोराडे, ए.एन. महावितरणचे चौधरी आणि अन्न पुरवठा कार्यालयाचे राजेश चव्हाण आदींची यावेळी उपस्थिती होती.

## लुंबिनी विद्यालयाचे क्रीडा स्पर्धेत यश





जाफराबाद | प्रतिनिधी - लुंबिनी विद्यालय कुंभारझरीच्या जिल्हा स्तरिय मैदानी क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश मिळविले आहे. विद्यालयाचे विद्यार्थी कुणाल दमुता तायडे (वर्ग ८) गोळा फेक द्वितीय, लक्ष्मी गणेश शिंदे वर्ग १० वा भालाफेक प्रथम क्रमांक पटकावला आहे. या विद्यार्थ्याचे अभिनंदन सम्राट अशोक शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुदामराव सदाशिवे, सचिव दिपक सदाशिवे, मुख्याध्यापक डि एस कासार सह शिक्षक डीचित्तेकर, व्हि डी चित्तेकर, आर जी जितकर, श्री बि आर दंदाले, जी ई मुंढे, आर टी भोपळे, एन पी भालेराव, पी आर चव्हाण, पी बी बंगाळे गावकरी मंडळी यांनी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षक जी ई घुगे यांचे अभिनंदन केले.

## ७७व्या निरंकारी समागमाच्या सेवांचा विधिवत शुभारंभ

# सेवेमध्ये कोणताही भेदभाव न बाळगता ती निष्काम भावनेने करावी - सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज

**जालना | प्रतिनिधी -** या जगामध्ये अनेक प्रकारचे लोक राहतात. त्यांची भाषा, वेशभूषा, आहार, जात, धर्म, संस्कृती वेगवेगळे आहे. या सगळ्या विभिन्नता असूनही आपल्या सर्वांमध्ये एक गोष्ट सारखी आहे आणि ती म्हणजे आपण सर्व मनुष्य आहोत. आपला वर्ण कोणताही असो, वेशभूषा कशीही असो, देश कोणताही असो किंवा खाणे-पिणे कसेही असो; सर्वांच्या धमण्यांमध्ये एकसारखेच रक्त वाहत आहे आणि सगळे एकसारखाच श्वास घेत आहेत. आपण सर्व परमात्म्याची लेकरं आहोत. हीच भावना अनेक संतांनी वेगवेगळ्या समयी आणि वेगवेगळ्या ठिकाणी आपापल्या भाषेतून आपापल्या शैलीमध्ये 'समस्त संसार, एक परिवार' या संदेशाच्या रूपात व्यक्त केली. मागील सुमारे ९५ वर्षांपासून संत निरंकारी मिशन हाच संदेश केवळ प्रेषित करत आहे इतकेच नव्हे तर अनेक सत्संग आणि समागमांचे नियमितपणे आयोजन करुन या संदेशाचे जीवंत उदाहरण प्रस्तुत करत आहे. मिशनचे लक्षावधी भक्त यावर्षीही १६, १७ आणि १८ नोव्हेंबर, २०२४ रोजी संत निरंकारी आध्यात्मिक स्थळ, समालखा, हरियाणा येथे होऊ घातलेल्या ७७व्या वार्षिक निरंकारी संत समागमामध्ये पोहचून मानवतेच्या महाकुंभमेळ्याचे दृश्य साकार करणार आहेत. देश-विदेशातून येणारे भक्तगण जिथे सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि सत्कारयोग्य निरंकारी राजपिता रमितजी यांचे पावन दर्शन घेऊन कृतार्थतेचा अनुभव घेतीलच, शिवाय एकोप्याने संत समागमातील शिकवणूकीतून आपली मनं उज्ज्वल करण्याचाही प्रयास करतील.




या संत समागमाची भूमी समागमासाठी तयार करण्याच्या सेवेचा शुभारंभ आज ६ ऑक्टोबर रोजी प्रतिवर्षाप्रमाणे सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिता रमितजी यांच्या शुभहस्ते करण्यात आला. याप्रसंगी मिशनच्या कार्यकारिणीचे सर्व सदस्य, केंद्रीय सेवादल अधिकारी आणि सत्संगचे हजारो अनुयायी उपस्थित होते. उल्लेखनीय आहे, की ६०० एकर जमीनीवर पसरलेल्या या विशाल समागम स्थळावर लाखो संतांची राहण्याची, भोजनाची, आरोग्याची तसेच जाण्या-येण्यासहीत अनेक प्रकारच्या व्यवस्था केल्या जातात ज्यासाठी अनेक ठिकाणांहून भक्तगणे येऊन महिनाभर निष्काम भावनेने सेवारत राहतात. या पावन संत समागमामध्ये सर्व थरातील संत व सेवादार भक्तगण आपल्या आप्तजनांसहित सहभागी होऊन एकत्वाच्या या दिव्य रुपाचा आनंद प्राप्त करतील. यावर्षीचा संत समागमाचा मुख्य विषय आहे - विस्तार, असीम की ओर! समागम सेवेच्या शुभरंभ प्रसंगी आयोजित विशाल सत्संग समारोहाला संबोधित करताना सतगुरु माताजी म्हणाल्या, की सेवा करताना सेवेकडे भेदभावाच्या दृष्टिने पाहू नये तर निरिच्छत, निष्काम भावनेने सेवा करायला हवी. सेवा तेव्हाच वरदान ठरते जेव्हा त्यामध्ये कोणताही किंतु, परंतु नसतो. सेवेसाठी कोणत्याही काळावेळाचे बंधन असू नये. समागमाच्या दरम्यान किंवा समागम संपेपर्यंतच सेवा करायची आहे असे नाही तर पुढील संत समागमापर्यंत सेवेची ही उत्कट भावना कायम टिकून राहायला हवी. ही तर निरंतर चालत राहणारी प्रक्रिया आहे. सेवा नेहमीच सेवाभावनेने युक्त होऊनच करायला हवी. असे केल्याने आपण शारीरिक रुपाने असमर्थ असलो तरीही सेवा कबूल होते. कारण ती सेवाभावनेने युक्त असते.

निरंकारी संत समागम, ज्याची प्रतीक्षा प्रत्येक भक्त वर्षभर करतात तो एक असा दिव्य उत्सव आहे जिथे असीम प्रेम, असीम करुणा, असीम विश्वास आणि असीम समर्पणाचा भाव असीम परमात्म्याच्या ज्ञानाच्या आधाराने सुशोभित होतात. मानवतेच्या या उत्सवामध्ये समस्त धर्मप्रेमींचे स्वागत आहे.

# टेंभुर्णी नृसिंह दुर्गा उत्सव महिला मंडळ समिती देवीचा जोगवा



**टेंभुर्णी | प्रतिनिधी -** येथील ब्राह्मण गल्लीतील पुरातन काळातील नसिंह मंदिरा समोर या वर्षी ही दुर्गा मातेची मनोभावे पुजा करुन रोज विविध महिलांच्या उपयोगी कार्यक्रम घेऊन विविध माहिती देऊन या ठिकाणी जागरण देवीचे जोगवा, देवी भजन,कीर्तन, जागरण,करून कार्यक्रम करत आहे. या वेळी गल्ली तील सर्व महिला मंडळ उपस्थित राहून या सर्व कार्यक्रमात सहभाग घेत आहे. हे सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाच्या अध्यक्ष असलेल्या सुरेखा काबरा, उपाध्यक्ष श्रद्धा देव, आशा खांडेभराड , विना काबरा, अर्चना मुळे वैशाली मुळे, प्राची मुळे ,मीनाक्षी मुळे, रुचिता सोमानी, दिपाली आवटी, गीता डहाके, ज्योती आमले, विद्या जोशी, शोभा देव, अर्चना शर्मा, जयश्री काबरा, मनीषा नाईक यादी विशेष परिश्रम घेत आहे.

## शेतकऱ्यांनी हरभरा बियाणांसाठी ऑनलाईन अर्जाचे आवाहन

**जालना-** अन्न व पोषण सुरक्षा अभियान अन्नधान्य पिके सन २०२४-२५ अंतर्गत रब्बी हंगामामंध्ये पीक प्रात्यक्षिके तसेच प्रमाणित बियाणे वितरण याबाबीचे नियोजन करण्यात आले आहे. चालु वर्षी हरभरा या पिकासाठी महाडिबीटी प्रणालीद्वारे बियाणे या घटकासाठी अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. तरी शेतकऱ्यांनी mahadbt.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### आ. गोरंट्याल यांचे शक्तीप्रदर्शन; उमेदवारीसाठी केला दावा; पक्षाशी एकनिष्ठ असलेल्यास उमेदवारी देण्याची मागणी

# जनतेतून नगरसेवक होऊ शकले नाही; आम्ही वाढवलेले बगलबच्चे दावे करताहेत

### अब्दुल हाफिज यांचे नाव न घेता आ. गोरंट्याल यांची जहरी टिका





**जालना । प्रतिनिधी -** जे जनतेतून नगरसेवक होऊ शकत नाहीत, मागच्या दाराने नगर परिषदेत आम्ही पाठवले, आम्ही वाढवलेले बगलबच्चे विधानसभेसाठी दावेदारी करताहेत अशी जहरी टिका अब्दुल हाफिज यांचे नाव न घेता आ. कैलास गोरंट्याल यांनी केली असून शक्ती प्रदर्शन करत उमेदवारीसाठी दावा केला आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जालना विधानसभा मतदार संघातून काँग्रेसपक्षाकडे इच्छुक म्हणून अनेकांनी अर्ज दाखल केले होते. यात प्रामुख्याने अब्दुल हाफिज यांना उमेदवारी मिळावी, यासाठी त्यांच्या समर्थकांकडून जोर लावण्यात येत होता. पक्ष निरीक्षक खा. डॉ. शोभाताई बच्छाव यांच्या उपस्थितीत सोमवार (दि ७) रोजी येथील एका मंगल कार्यालयात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्यावतीने जालना जिल्ह्यातील पाचही विधानसभा मतदार संघातून काँग्रेस पक्षाकडून निवडणुक लढविण्यासाठी इच्छूक असलेल्या उमेदवारांच्या मुलाखती आयोजित करण्यात आल्या होत्या. यावेळी खा. डॉ. कल्याण काळे, प्रदेश उपाध्यक्ष आ. कैलास गोरंट्याल, आ. राजेश राठोड, जिल्हा काँग्रेस अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, माजी आ. सुरेशकुमार जेथलिया, युवा नेते अक्षय गोरंट्याल, अन्वर देशमुख, शहर जिल्हाध्यक्ष शेख महेमूद, जिल्हा कार्याध्यक्ष राजेंद्र राख, कल्याणराव बोराडे, विजय चौधरी, अविनाश चव्हाण आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती. प्रसंगी उपस्थित आ. गोरंट्याल समर्थक, कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी गोरंट्याल यांच्या समर्थनार्थ जोरदार घोषणाबाजी केली.

यावेळी आ. कैलास गोरंट्याल यांचे समर्थक वाजेद खान, महावीर ढक्का , आरेफ खान, जगदीश भरतीया, रऊफ परसुवाले, अनिल पाखरे आदींनी आ. कैलास गोरंट्याल हे सर्व समाजाला सोबत घेऊन चालणारे असून, त्यांच्या कार्यपद्धतीचा आढावा पक्ष निरीक्षकांसमोर मांडला. तसेच पक्षाशी एकनिष्ठ नसलेल्या आणि पक्षासाठी कोणतेही योगदान न देणाऱ्या व्यक्तींचा उमेदवारीसाठी विचार न करता, आ. गोरंट्याल यांनाच उमेदवारी द्यावी, अशी मागणी करत त्यांना मोठ्या मताधिक्क्याने विजयी करण्याची ग्वाही पक्ष निरीक्षकांना दिली. आ. गोरंट्याल म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत पक्षाचे उमेदवार डॉ. कल्याण काळे यांना विजयी करण्यासाठी पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. त्यामुळे काळे हे मोठ्या मताधिक्क्याने निवडून आले. विधानसभा मतदार संघातील उमेदवारीसाठी काहीजण हवा देण्याचे काम करत आहेत. मात्र, हवेची दिशा केव्हा बदलेल याची खात्री नसते, असा टोला आ. गोरंट्याल यांनी लगावला. जे कुणी उमेदवारीसाठी दावे करत आहेत. ते आम्ही वाढवलेले बगलबच्चे असून, त्यांना जनतेतून नगर पालिकेत जाता आले नाही, अशांना आम्ही मागच्या दाराने पाठवले. अशी टिका अब्दुल हाफीज यांचे नाव न घेता करत पक्षाशी एकनिष्ठ असणाऱ्या इच्छूक उमेदवारांचा विचार करावा, अशी अपेक्षा व्यक्त करुन जालना विधानसभा मतदार संघातून आपण इच्छूक असल्याचा दावा त्यांनी पक्ष निरीक्षकांसमोर केला. यावेळी जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांचेही भाषण झाले. प्रारंभी पक्षनिरीक्षक खा. डॉ. शोभाताई बच्छाव यांचा जिल्हाध्यक्ष देशमुख, खा. डॉ. काळे, आ. गोरंट्याल, आ. राजेश राठोड, शेख महेमूद, राजेंद्र राख यांनी सत्कार केला. त्यानंतर मंगल कार्यालयातील एका बंद खोलीत मतदार संघनिहाय इच्छूक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या.

## जनतेचा पैसा विकासाच्या नावाखाली भ्रष्टाचार करत उधळला

### पत्रकार परिषदेत रामप्रसाद थोरात यांचा आ. बबनराव लोणीकर यांच्यावर आरोप

**परतूर । प्रतिनिधी -** जनतेचा टॅक्स रूपात गोळा केलेला पैसा लोणीकर यांनी विकास कामाच्या नावाखाली भ्रष्टाचार करत उधळला असल्याचा आरोप भाजपाचे माजी जेष्ठ नेते तथा नुकताच वंचित बहुजन आघाडी मध्ये प्रवेश केलेले रामप्रसाद थोरात यांनी केला.

परतूर इंद्रा मंगल कार्यालयात त्यांनी बोलावलेल्या पत्रकार परिषेत ते बोलत होते यावेळी दीपक डोके मराठवाडा उपाध्यक्ष वंचित, डॉ. किशोर त्रिभुवन, श्रीकांत राठोड, परमेश्वर खरात, शिवाजी डोळस, चोखाजी सौंदर्य, देवीदास कोळ, गौतम खंडागळे, राजेंद्र वांजुळे, परमेश्वर पोटे, रोहन वाघमारे, सुभाष जाधव, रवी भदर्गे यांची उपस्थिती होती.


यावेळी रामप्रसाद थोरात यांनी म्हटले कि, आ. लोणीकर यांच्या पेक्षा मी भाजपा परिवाराचा जुना नेता आहे. मात्र भाजपा ची भूमिका आरक्षणाच्या बाबतीत बदलत चालली आहे. त्यामुळे ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता मराठा आरक्षण हवे ही भूमिका घेऊनच आपण वंचित पक्षात प्रवेश केला असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. आ. बबनराव लोणीकर यांनी मतदार संघाला दिशा देणारा विकास केला नसल्याची टिका करत त्यांनी केली. शेतकऱ्यांना व सामान्यांना दिलासा देणाऱ्या कुठल्याही योजना परतूरात राबवल्या गेल्या नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

यावेळी वंचितकडून विधानसभा निवडणुकीत परतूर मतदार संघातून आपल्याला संधी मिळत आहे. निवडून आल्यास या मतदार संघात खरा विकास काय असतो हे कार्याच्या माध्यमातून सिद्ध करून दाखवेल अशी ग्वाही देखील श्री थोरात यावेळी दिली.

दरम्यान तत्पुर्वी रामप्रसाद थोरात यांच्या प्रवेशबद्दल वंचित आघाडी कडून त्यांचा सत्कार करण्यात आला. रडायचे नाही आता लढायचे या शब्दात थोरात यांनी कार्यकर्त्यांना संबोधीत केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन राहुल नाटकर शहराध्यक्ष यांनी केले. यावेळी वंचित बहुजन आघाडी परतुर मंठा विधानसभा व तालुका पदाधिकाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.




## उल्लेखनीय कामगिरीबद्दल परतूर पोलीसांचा सन्मान



**परतूर । प्रतिनिधी -** पोलीस स्टेशन परतुर येथे दाखल असलेले चोरीचे सतरा गुन्हाचा शोध लागला असून गुन्यामधील आरोपी अटक करून आरोपी यांचे कडून शेतकऱ्याच्या पाण्याच्या मोटर, मोटर्सचे चे केबल असे चोरीस गेलेला १,०१,६७० रूपायांचा असा मुद्देमाल हस्तगत केला आहे, तसेच परतूर पोलीस स्टेशन हद्दीतील जनावर चोरींचे गुन्ह्यामध्ये आरोपी यांचा शोध घेऊन आरोपींना अटक करून आरोपी यांचेकडून ५,६०,००० रूपये असा मुद्देमाल हा हस्तगत करण्यात आला आहे. ही कामगिरी पोलीस निरीक्षक मच्छिंद्र सुरवसे, पोलीस उपनिरीक्षक विठल केंद्रे, पोलिस हवालदार इस्माईल शेख, चालक पोलीस हवालदार विष्णू धोत्रे, पोलीस शिपाई ज्ञानेश्वर वाघ दीपक आडे अच्युत चव्हाण, सतीश जाधव, परमेश्वर माने अंबादास दांडगे यांनी केली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांनी प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा सन्मान केला आहे.

## टेंभुर्णीत उपवासाच्या भगरीतून पाच जणांना विषबाधा

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** उपवासाच्या भगरीतून विषबाधा झाल्याचा प्रकार टेंभुर्णी येथे घडला आहे. सध्या नवरात्रामुळे अनेक भाविकांना नऊ दिवस देवीचे उपवास आहे. दरम्यान भगरीच्या पिठातून दोन परिवारातील पाच जणांना विषबाधा झाल्याचे पुढे आले आहे. याबाबत माहिती अशी की येतील गोरख शिंदे यांच्या परिवारातील त्यांच्या आई जिजाबाई शिंदे व पत्नी दुर्गा शिंदे यांना तर लक्ष्मण शिंदे यांच्या परिवारातील स्वतः लक्ष्मण शिंदे, त्यांच्या पत्नी संगीता शिंदे, भाऊ संतोष शिंदे व शाम शेषराव खरात अशा नऊ जणांना विषबाधा झाल्याने त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार करण्यात येत आहे. हा प्रकार शुक्रवार व शनिवारी घडला आहे. या सर्वांनी दुकानावरून भगरीचे पीठ आणून त्याच्या भाकरी करून खाल्ल्या होत्या. त्यानंतर त्यांना मळमळ, उलट्या व संडासचा त्रास होऊ लागला. या सर्वांनी तातडीने रुग्णालयात उपचार घेतल्याने त्यांची प्रकृती सध्या स्थिर आहे. यापैकी संगीता शिंदे यांना जास्त अस्वस्थ वाटत असल्याने त्यांना शनिवारी जालना येथे रेफर करण्यात आले आहे. दरम्यान परिसरात डावरगाव देवी व इतरही काही गावात भगरीतून विषबाधा झाल्याचा प्रकार घडला आहे.



खुली भगर किंवा भगरीचे पीठ यातून अनेकदा विषबाधा झाल्याचे प्रकार उघडकीस आले आहे. भगर किंवा पिठाला बुरशी लागल्याने हे प्रकार घडत असतात. यासाठी नागरिकांनी भगर खरेदी करताना विशेष काळजी घ्यावी. विशेषतः खुली भगर किंवा पीठ न घेता पॅकिंगचा माल घेण्यास पसंती द्यावी. हा माल घेतानाही त्यावरील एक्सपायरी डेट तपासून पहावी. यासोबतच उपवासासाठी भगरी शिवाय इतर पदार्थांचा पर्याय उपलब्ध असेल तर त्यांचा फराळासाठी वापर करावा. असा काही प्रकार घडल्यास त्वरित रुग्णालयात उपचार घ्यावेत.

विषबाधेच्या कोणत्याही प्रकारात शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊन रुग्णाला मोठ्या प्रमाणात अशक्तपणा जाणवतो. उपवास धारकांनी शक्यतो भगर, शिळे पदार्थ व उघड्यावरील पदार्थ खाण्याचे टाळावे. विषबाधेचा कुठलाही प्रकार घडल्यास दुखणे अंगावर न काढता त्वरित सरकारी रुग्णालयात दाखल व्हावे. रुग्णालयात याबाबतीत सर्व उपचार उपलब्ध असल्याचे टेंभुर्णी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकिय अधिकारी डॉ. शिवहारी जायभाये यांनी म्हटले आहे.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.